# शिवाजी विद्यापीठाकडून पंचगंगा घाट चकाचक

## वीस टन कचऱ्याचा उठाव

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या ७५० स्वयंसेवकांनी येथील पंचगंगा घाट परिसरात स्वच्छता मोहीम राबवताना दिवसभरात सुमारे २० टन कचरा उठाव केला. महापुराच्या पाण्याने काठावर आणून टाकलेल्या कचऱ्याचा उठाव झाल्याने काही तासांतच घाट परिसर चकाचक झाला.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी सकाळी नऊ वाजता पंचगंगा घाट परिसराच्या स्वच्छता मोहिमेचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी स्वतः हातात खोरे घेऊन एनएसएस स्वयंसेवकांच्या साथीने स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. या मोहिमेमध्ये सातारा जिल्ह्यातून आलेल्या स्वयंसेवकांसह स्थानिक अशा सुमारे ७५० स्वयंसेवकांनी ४० कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली या मोहिमेत सहभाग घेतला. प्लास्टिक साहित्य, झाडेझुडपे, काचेच्या बाटल्या, तुटक्या फुटक्या मूर्ती, नदीला अर्पण केलेले नारळ, गाळ-चिखल आदी प्रकारच्या मलव्याची स्वच्छता करण्यात आली. पंचगंगा घाट परिसराबरोबरच राजाराम बंधारा, पंचगंगा स्मशानभूमी या परिसरातही स्वच्छता करण्यात आली. त्या ठिकाणाहूनही अनुक्रमे पाच आणि दोन टन अशा एकूण सात टन कचऱ्याचा उठाव करण्यात आला. शहरातून घाटाकडे येणाऱ्या गंगावेस ते शिवाजी पूल रस्त्यासह पाणंद रस्ता, तोरस्कर चौक या ठिकाणीही स्वच्छता करण्यात आली. या परिसरातूनही सुमारे दोन टन प्लास्टिक कचऱ्याचा उठाव करण्यात आला.

गेल्या काही दिवसांत रंकाळा तलाव परिसरात राबवण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेंतर्गतही सुमारे वीस टन कचरा उचलण्यात आला आहे. या सर्व मोहिमेदरम्यान कोल्हापूर महापालिकेसह जिल्हा प्रशासनाकडूनही मोठे सहकार्य लाभल्याचे डॉ. डी. के. गायकवाड यांनी सांगितले.



**कोल्हापूर : पंचगंगा घाट स्वच्छता मोहिमेत सक्रिय योगदान देताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, इतर पदाधिकारी आणि विद्यार्थी**

### ११ गावांत मोहीम

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत २६ ऑगस्टपासून कोल्हापूर शहरासह शिरोळ तालुक्यातील पूरबाधित ११ गावांत स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. नृसिंहवाडी, अर्जुनवाड, औरवाड, राजापूर, खिद्रापूर, आलास, कवठेगुलंद, कनवाड, घालवाड, गणेशवाडी, अब्दुललाट या गावांचा समावेश राहिला. मोहिमेत कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ८०० विद्यार्थी आणि ४०० विद्यार्थिनी अशा सुमारे १२०० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. त्याचप्रमाणे सांगली व सातारा जिल्ह्यांतील विविध पूरग्रस्त ठिकाणीसुद्धा नजीकच्या महाविद्यालयातील एनएसएसच्या स्वयंसेवकांनी स्वच्छता मोहीम राबवली. स्वच्छतेबरोबरच सर्वेक्षण आणि समुपदेशनाचे कार्यही या स्वयंसेवकांनी केले, अशी माहिती डॉ. डी. के. गायकवाड यांनी दिली.

# शिक्षणाला मिळतेय संशोधक दृष्टी







डॉ. देवानंद शिंदे

कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

शिक्षणाला संशोधनाची जोड मिळणे ही नव्या काळाची गरज बनली आहे. त्यादृष्टीने नव्या गरजा ओळखून राष्ट्रीय स्तरावर ज्या योजना आखल्या जात आहेत, त्यात शिवाजी विद्यापीठाचा धागा जोडला जाणे ही अभिमानास्पद गोष्ट आहे. राष्ट्रीय पातळीवरील केंद्रांसाठी काम करताना विद्यापीठाची सक्षमता वेगळ्या अर्थाने नोंद होत आहे. संशोधन हे केवळ विज्ञान विषयातच केले जाते या संकुचित विचारातून बाहेर पडणारा विद्यार्थी आणि शिवाजी विद्यापीठ हे समीकरण अधिक दृढ करण्यासाठी नव्या प्रकल्पांची बांधणी व त्यावर प्रत्यक्ष काम याची कास धरण्यात आली आहे. स्टार्ट अप कोल्हापूर या संकल्पनेला मूर्त रूप देणारा भविष्यातील उद्योजक हा आजचा विद्यार्थी असणार आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठातून बाहेर पडणारा प्रत्येक विद्यार्थी 'माइंट टू मार्केट' या सूत्रानुसार घडवण्यासाठी विद्यापीठातील प्रत्येक अभ्यासक्रम एक परीसस्पर्श ठरणार आहे.

सध्या शिक्षणातून मिळणाऱ्या संधी ज्याप्रकारे विस्तारल्या आहेत, त्याचप्रमाणे ज्ञानाचा वापर संशोधन, नवकल्पना यासाठी करण्याचाही शिक्षणातील एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. नॉलेज शेअरिंग हा शैक्षणिक व्यवस्थेचा गाभा आहे. त्यामुळे गेल्या चार वर्षांत अनेक परदेशी विद्यापीठे व संस्था यांच्यासोबत शिवाजी विद्यापीठाने जो सामंजस्य करार केला, त्यातून विद्यार्थ्यांना विपुल संधी मिळाल्या आहेत. दक्षिण कोरियासोबत झालेल्या करारातून ब्रेनपूल फेलोशिपची कवाडे खुली झाली आहेत. नॅसकॉमसोबत केलेल्या करारातून 'सुपर कम्प्युटर'ही संकल्पना विद्यापीठात यशस्वी झाली आहे. ज्यामुळे अनेक विभाग पेपरलेस करण्यात आले आहेत. सीडॅकसोबत जो करार झाला त्यातून विद्यार्थ्यांनी स्वतंत्रपणे ॲप बनवले असून, त्यांची समाजउपयुक्तता वाढली आहे. गेल्या चार वर्षांत २८ हून अधिक सामंजस्य करार झाले असून, विद्यार्थी व प्राध्यापकांच्या ज्ञानात भर टाकणारी ही प्रक्रिया ठरत आहे.

पान ४ वर

# दुर्गम दऱ्या-डोंगरातील गुराखी ते डॉक्टरेट..!

## बाबूराव घुरकेचा संघर्षमय प्रवास; शाहूवाडी तालुक्यातील डंगे धनगर समाजातील पहिला पीएच.डी.धारक

**संदीप खांडेकर** : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : गावाला जायचे तर पक्का रस्ता नाही, या रस्त्यावर एस. टी.ची चाकेही कधी फिरलेली नाहीत. शिक्षण घ्यायचे तर पायपीट नित्याची, त्याची पर्वा न करता बाबूराव बमू घुरके याने शिक्षणाची पायरी सोडली नाही. कमवा व शिका योजनेत सहभागी होऊन भूगोल विषयात पदवी मिळवली. पुढे तो नेट परीक्षाही उत्तीर्ण झाला. त्याच बाबूरावने गुराखी ते प्राध्यापक



**डॉ. बाबूराव घुरके**

अशा खडतर संघर्षानंतर पीएच.डी. मिळवली आणि तो शाहूवाडी तालुक्यातल्या १०४ धनगरवाड्या-वस्त्यांवरील डंगे धनगर समाजातला पहिला डॉक्टरेट झाला.

बाबूरावचे आई-वडील अशिक्षित. त्यामुळे त्याची मूळ जन्मतारखेचा पत्ता नाही. त्याचे प्राथमिक शिक्षण गिरगाव धनगरवाड्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत झाले. त्याने माध्यमिक शिक्षण गावापासून आठ किलोमीटर दूर असलेल्या येळवण जुगाईमधील जुगाई हायस्कूलमधून घेतले. मलकापुरातील ग. रा. वारंगे ज्युनिअर कॉलेजमध्ये त्याचे उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले आणि पदवीच्या शिक्षणासाठी तो महावीर महाविद्यालयात दाखल झाला. शिक्षण घेत असताना तो गुराख्याचे काम करत राहिला. कमवा व शिका योजनेत श्रमदान करत त्याने भूगोल विषयात पदवी, तर शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागशास्त्र विभागातून पदव्युत्तर पदवी मिळवली. कळंबा रोडवरील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्राच्या वसतिगृहात राहून त्याने आयटीआय पूर्ण केला. एम. ए.चे शेवटचे वर्ष संपताच 'नेट'सारख्या अवघड परीक्षेत त्याने यशाचा झेंडा फडकवला.

या यशानंतर त्याने पीएच.डी.साठी प्रवेश घेतला. मुंबई येथील प्रा. डॉ. रतन हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली 'लेव्हल ऑफ सोशल डेव्हलपमेंट इन कोल्हापूर डिस्ट्रिक्ट : जिऑग्राफिकल ॲनॅलेसिस' विषय शोधप्रबंधासाठी निवडला. त्याचा काटेकोर अभ्यास केला. त्यासाठी बारा तालुक्यातील चोवीस गावांची पायपीट केली. ग्रामस्थांचा सामाजिक व आर्थिकदृष्ट्या अभ्यास केला. त्याच्या शोधप्रबंधाचे नुकतेच सादरीकरण झाले आणि त्याचे डॉक्टरेट होण्याचे स्वप्न सत्यात उतरले.

### शाहू महमाविद्यालयात प्राध्यापक

सध्या तो रयत शिक्षण संस्थेच्या राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयात भूगोल विभागात सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. त्याला प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. सुरेश पवार, डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. मीना पोतदार, डॉ. दिनेश भंडारे, डॉ. विक्रम पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले.

# शिक्षणाला मिळतेय संशोधक दृष्टी

पान १ वरून

## शेतीक्षेत्रात संशोधन

प्राणीशास्त्र वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र व पर्यावरणशास्त्र या प्रामुख्याने चार विभागांच्या पुढाकाराने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ग्रामीण व शेतीपूरक उद्योगांना चालना देण्यासाठी अनेक प्रयोग गेल्या चार वर्षांत यशस्वी केले आहेत. विद्यापीठातील बहुतांश विद्यार्थी ग्रामीण भागातील असल्याने त्यांना शेतीची पार्श्वभूमी आहे. पारंपरिक शेतीची चौकट मोडून या विद्यार्थ्यांना शेती व संशोधन यांचा समन्वय साधून काम करण्यासाठी अनेक लघुअभ्यासक्रम तयार केले आहेत. तसेच प्रत्यक्ष काम करत असलेल्या कामगार, शेतकरी यांना कौशल्य देण्यासाठीही अभ्यासक्रमामध्ये सामावून घेतले जात आहे.

आजरा घनसाळ तांदळावर संशोधन करून कमी कालावधीत उच्चदर्जाचा तांदूळ तयार करणारी यंत्रणा बॉटनी विभागाने कार्यान्वित केली आहे. गुळाला जागतिक बाजारपेठेत स्थान मिळवून देण्यासाठी प्रमाणित गूळ गुणवत्ता केंद्र सुरू आहे. कोकणातून लोप पावत असलेल्या केळीच्या प्रजातीचे संशोधित रोप तयार करून त्याबाबत देशपातळीवर वाहवा मिळवण्याचे श्रेयही विद्यापीठाला मिळाले आहे. रेशीमशेतीसाठी पारंपरिक शेतकऱ्यांना मार्गदर्शन केल्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे रेशीम उत्पादन आज बेंगलोरमध्ये पोहोचले आहे.

## नॅनो सायन्स इनोव्हेशन

ग्रामीण विद्यापीठ कक्षेत येणाऱ्या शिवाजी विद्यापीठाने गावाकडच्या विद्यार्थ्यांलाही जागतिक ज्ञानअवकाश खुले व्हावे, या ध्येयातून कार्यान्वित केलेल्या तीन विविध योजनांमुळे शिवाजी विद्यापीठ माहिती तंत्रज्ञानातील जागतिक संशोधनाच्या यादीत कोरले गेले आहे. स्मार्ट तंत्रज्ञानाच्या विस्तारामुळे विविध क्षेत्रांतील सुरक्षा धोक्यात आली आहे. यासाठी केंद्रस्तरावर संरक्षणासाठी माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत उभारलेल्या महत्त्वपूर्ण संशोधनात शिवाजी विद्यापीठानेही राष्ट्रीय स्तरावर झेप घेतली आहे. सायबर सिक्युरिटी सेंटर, नॅनो फॅब्रिक्स सेंटर आणि सेंटर फॉर व्हीएलएसआय या राष्ट्रीयस्तरावरील तीन योजनांमध्ये विद्यापीठाने आघाडी घेतली आहे. सेंटर फॉर नॅनो फॅब्रिक्समध्ये नॅनो सायन्सवर आधारित तंत्रज्ञानाचा वापर करून आधुनिक कापड निर्मितीसंदर्भात देशपातळीवर संशोधन सुरू आहे. भविष्यात कपड्यांची निर्मिती या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून केली जाणार असून यात विद्यापीठातील केंद्राद्वारे होणाऱ्या संशोधनाचे योगदान मिळणार आहे. गेल्या दीड वर्षांपासून हे केंद्र कार्यरत आहे. माणसाचा वेळ अमूल्य मानून काळाची पावले ओळखत विविध क्षेत्रात संशोधनाच्या कक्षा रूंदावत आहेत. त्यात भविष्यात कपड्यांवरील कोणताही डाग हा केवळ कपड्यावर हात झटकून नष्ट करता येणारे फॅब्रिक ही काळाची गरज बनणार



आहे. या मूलभूत संकल्पनेवर विद्यापीठातील नॅनो फॅब्रिक्स सेंटरच्या माध्यमातून केंद्रस्तरावर सुरू असलेल्या कापडनिर्मिती व पर्यायाने वस्त्रोद्योगाला नवी चालना देणारे ठरत आहे.

## क्रीडा क्षेत्रात भरारी

जागतिकस्तरावर खेळाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. बीपीएडनंतर उच्चशिक्षण घेण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. मात्र, बहुतांश महाविद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षणातून पदवी व पदव्युत्तर शिक्षणाची सुविधा नव्हती. एमपीएडनंतर पीएचडी करण्यासाठीही विद्यापीठात तज्ज्ञ मार्गदर्शक नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रातील संशोधनाकडे पाठ फिरवावी लागत होती. ही गरज ओळखून विद्यापीठात क्रीडाविषयक असंख्य उपक्रम, योजना, नव्या खेळांसाठी पूरक सुविधा दिल्या आहेत. वेगळ्या खेळांमध्ये रस असलेल्या खेळाडूंसाठी ट्रॅक करण्यात आले आहेत. सायकलिंगमध्ये विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी करावी यासाठी ट्रॅकसह फायबरच्या सायकल खरेदी करण्याचे प्रयोजन आहे. खेळाडूंना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी लागणाऱ्या आर्थिक मदतीसह सुविधांवरही विशेष तरतूद केली आहे.

## सायबर सिक्युरिटीत ठसा

सुरक्षायंत्रणा सतर्क करण्यासाठी देशपातळीवर स्वतःची जीपीएस प्रणाली कार्यान्वित केली जात आहे. यात अंतराळ संशोधनात कार्यरत 'इस्रो'सारख्या संस्थेच्या नेतृत्वाखाली देशाची जीपीएस यंत्रणा उभारणारी उपग्रह मालिका अवकाशात प्रक्षेपित करण्यात आली आहे. या उपग्रह मालिकेच्या कामात विद्यापीठाने योगदान दिले असून पन्हाळा येथील अवकाश केंद्रामध्ये त्यासाठीचा रिसिव्हर बसवण्यात आला आहे. या रिसीव्हरच्या कक्षेत सुमारे एक हजार एरियल स्पेस मिळत असल्यामुळे विद्यापीठाच्या केंद्रावर इस्त्रोमधील शास्त्रज्ञांना काम करण्यास विशेष संधी मिळाली आहे.

देशातील १३ पैकी एक रिसीव्हर बसवलेले देशातील एकमेव विद्यापीठ आहे. या सेंटरच्या माध्यमातून देशाच्या संरक्षणदलाच्या नेतृत्वाखाली काही महत्त्वाच्या चिप्स बनवण्याचे काम करण्यात येत आहे. या रिसिव्हरमुळे विद्यापीठाचे अवकाश केंद्र 'इस्रो'च्या नकाशावर दाखल झाले आहे. देशातील पहिले सायबर सिक्युरिटी केंद्र स्थापन करण्याची संधीही विद्यापीठाला मिळाली आहे. तीन वर्षांत दोन हजार सायबर सिक्युरिटी क्षेत्रात तज्ज्ञ घडवण्याची जबाबदारी या केंद्राच्या माध्यमातून आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 SEP 2019
Times of India

# University offers certificate course in Portuguese

TOI



Around 35 students pursuing political science at Vivekanand College recently visited the Kolhapur ZP office

The department of foreign languages of Shivaji University, Kolhapur (SUK), has offered certificate course in Portuguese from this academic year. The one-year course will be conducted on Friday and

**CAMPUS BUZZ**

Saturday. The interested students have been asked to contact the department of foreign languages of the university for more details.

**Vivekanand College students visit ZP office:** Around 35 students pursuing political science in the Vivekanand College recently visited the Kolhapur Zilla Parishad office to learn about their functioning and administrative work. During their visit, the students interacted with the zilla parishad officials. They also learned about various schemes from the state and the central government.

**IMD scientist interacts with students:** Devendra Singh, a scientist with the India Meteorological Department (IMD), interacted with the students of Sanjay Ghodawat University's Material Science Department. He said that the students should keep their research curiosity intact. Singh interacted with the students under the university's initiative of 'scientist's visit'. He has published more than 100 research articles on various subjects related to meteorology.

# 'कोल्हापुरी'चे स्टेप अप...



कोणत्याही व्यवसायाची सुरुवात आणि विकास हा त्या व्यवसायाच्या निर्मितीवेळच्या संकल्पनेवर अवलंबून असतो. तसेच कोणत्याही व्यवसायाची यशस्विता ही त्या व्यवसायात आवश्यक असणाऱ्या कौशल्यावर अवलंबून असते.



**प्रा. डॉ. ए. एम. गुरव**
समन्वयक, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ

कोल्हापुरी चप्पलसारख्या उद्योगांना ऊर्जितावस्था प्राप्त करून देण्यासाठी नवीन व होतकरू उद्योजकांनी स्टार्ट अप सुरू करणे आवश्यक आहे, तर सध्याच्या उद्योजकांनी या उद्योगाची पुनर्बांधणी अत्यावश्यक आहे. नवउद्योजकांना शक्य होईल, परवडेल व सक्षमपणे दीर्घ मुदतीसाठी कार्य करू शकेल अशा प्रकारे कोल्हापुरी चप्पल व इतर अनुषांगिक उत्पादन, उपउत्पादने करणे गरजेचे आहे.

कोल्हापूरी चप्पल व इतर उत्पादनांची मोठया प्रमाणात उत्पादन व विक्री करण्यासाठी 'समूह विकास' साधने आवश्यक आहे. यासाठी प्रभावी पद्धतीने कोल्हापुरी चप्पल औद्योगिक क्लस्टरची सुरुवात करुन विविध उत्पादने व कॉमन फॅसिलीटी सेंटर गरजेचे आहे. कोल्हापुरी चप्पलला विशेष महत्त्व आहे. नावलौकिक आहे. आरोग्यास उपयुक्त आहे यामुळे व्यावसायिक व्यवस्थापनाचा अंगिकार करून कोल्हापुरी चप्पलला उर्जितावस्था आणून दिली पाहिजे. या व्यवस्थापनामध्ये कारागिरांना प्रशिक्षण देणे, संशोधन करणे, बाजारपेठेचे सर्वेक्षण करणे, राष्ट्रीय बाजारपेठ शोधणे, अधिकाधिक ग्राहकांचे मत कोल्हापुरी चप्पल खरेदीकडे वळविणे, चप्पल तयार करणाऱ्या व्यावसायिकांना व व्यापाऱ्यांना मार्गदर्शन केले पाहिजे. तसेच प्रभावी वेबसाइट निर्माण करून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ऑनलाइन पद्धतीने कोल्हापूर चप्पल विकणे, चप्पल व उप उत्पादनासाठी यांत्रिकीकरण आधुनिकीकरण करणे, ब्रँडिंग करणे, चांगल्या प्रतीच्या कच्च्या मालाची उपलब्धता, कमी व्याजदराने व पुरेसे भांडवल गरजेचे आहे. चप्पल तयार करत असताना चमड्याचे तुकडे पडतात किंवा वेस्ट निर्माण होते अशा चामड्यापासून व्हॅल्यू अडेड प्रॉडक्टस् तयार करणे, भेटवस्तू तयार करणे. उत्पादनासाठी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे स्टार्ट अपद्वारे शिक्षित तरुणांनी या व्यवसायामध्ये सहभाग घेणे, विपणनाचे ज्ञान देणे. कोल्हापूर व यासारख्या शहरांमध्ये कोल्हापुरी चप्पल व इतर उत्पादनांचे शोरुम (दालन) सुरू करणे उपयुक्त ठरेल.

लोकमत

# एनएसएस स्वयंसेवकांकडून अत्युच्च सेवाभावाचे प्रदर्शन : कुलगुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेबकांनी महापुरामुळे पश्चिम महाराष्ट्रात उद्भवलेल्या अभूतपूर्व आपत्तीच्या प्रसंगी अतिशय उदात्त, धैर्य, साहस आणि सेवाभावाचे अत्युच्च प्रदर्शन केले. आपल्या भावी जीवनातही त्यांनी अशाच प्रकारे कार्यरत राहावे आणि देशसेवा बजाबावी, असे आबाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी शनिवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत दि. २६ ते ३१ ऑगस्टदरम्यान आयोजित निवासी विद्यापीठस्तरीय विशेष शिबिराच्या

## समाजाची उन्नती साधण्याचा प्रयत्न करा

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या माध्यमातून माणुसकीचा आणि महासेवेचा महापूर दिसला. अतिशय उच्चप्रतीची निस्वार्थ भावनेने केलेली सेवा दिशादर्शक ठरेल. हा निस्वार्थ सेवाभाव राष्ट्रीय सेवा योजनेपुरता मर्यादित न ठेवता आपल्या जीवनामध्ये त्याचा उपयोग करुन समाजाची उन्नती साधण्याचा प्रयत्न करावा. जबाबदार नागरिक म्हणून आणि विद्यापीठाचे विद्यार्थी म्हणून आपल्या पालकांचा नावलौकिक करावे.

समारोप प्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रमामध्ये कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी दिव्या सुतार, प्रियांका लोखंडे, डॉ. एन. बी. माने यांनी आपले मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजना प्र-संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. तत्पूर्वी, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकाऱ्यांचा सत्कार कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते केला. याप्रसंगी विद्यापीठाचे क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# 'एनएसएस'कडून स्वच्छता मोहीम

कोल्हापूर : विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) स्वयंसेवकांनी शहरातील पूरस्थिती ओसरल्यापासून महापालिकेच्या स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला. त्यानंतर पूरग्रस्त गावांमध्ये स्वच्छता मोहिमेसह समुपदेशन, सर्वेक्षण, आदी कामांमध्ये सहभाग घेतला. त्यामध्ये विद्यापीठाचे सातारा जिल्ह्यातील 'एनएसएस'चे सुमारे ६५० स्वयंसेवक आणि २५ कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले.

विद्यापीठाने औरवाड, अर्जुनवाड, कवठेगुलंद, गणेशवाडी, बुबनाळ, शेडबाळ, अब्दुललाट, टाकवडे, नृसिंहवाडी, खिद्रापूर आणि कुरुंदवाड ही पूरग्रस्त गावे स्वच्छता, सर्वेक्षण आणि समुपदेशनासाठी दत्तक घेतली आहेत.

# डॉ. रूपा शहा यांच्या २५ व्या पुस्तकाचे प्रकाशन



प्रा.डॉ. रूपा शहा यांच्या सहकारावरील २५ व्या पुस्तक प्रकाशनप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व मान्यवर.

कोल्हापूर / प्रतिनिधी : शिवाजी विद्यापीठाच्या नवीन सी.बी.सी.एस. अभ्यासक्रमाप्रमाणे प्रा. डॉ. रूपा शहा व सोलापूर येथील प्रा. डॉ. बी. एच. दामजी यांनी लिहिलेल्या बी. ए. भाग-२ (सेमिस्टर ३ व ४) च्या 'सहकार' या विषयावरील पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. फडके प्रकाशनसाठी सहकार या विषयावर प्रा. डॉ. शहा यांनी लिहिलेले हे पंचवीसावे पुस्तक असल्याने कुलगुरू प्रा. डॉ. शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

विद्यापीठातील कुलगुरूंच्या दालनात झालेल्या या प्रकाशन समारंभाला प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदवडेकर, उपकुलसचिव वैभव ढेरे व गिरीश कुलकर्णी, अर्थशास्त्र विभागप्रमुख एम. एस. देशमुख, वित्त अधिकारी व्ही. टी. पाटील, प्रवीण बाबर, कुलगुरूंचे स्वीय सहायक विलास सावंत, मिलिंद कोळी आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. शहा यांनी स्वागत व प्रास्ताविक करताना अर्थव्यवस्थेसमोरील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सहकार चळवळ मजबूत असणे आवश्यक आहे. ही गरज असल्याने आपण सहकार या विषयावरील पुस्तके लिहित गेल्याचे सांगितले. प्रकाशक मंदार फडके यांनी आभार मानले.

घराघरात... मना मनात...
पुण्य नगरी
जाहीर प्रगटन
आता फक्त

# एनएसएस स्वयंसेवकांकडून सेवाभावाचे प्रदर्शन : कुलगुरू

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी महापुरामुळे पश्चिम महाराष्ट्रात उद्‌भवलेल्या अभूतपूर्व आपत्तीप्रसंगी अतिशय उदात्त, धैर्य, साहस आणि सेवाभावाचे अत्युच्च प्रदर्शन केले. आपल्या भावी जीवनातही त्यांनी अशाचा प्रकारे कार्यरत राहावे आणि देशसेवा बजावावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आपत्ती व्यवस्थापनअंतर्गत सहा दिवसांच्या निवासी विद्यापीठस्तरीय विशेष शिबिराच्या समारोपप्रसंगी कुलगुरू डॉ.शिंदे बोलत होते. कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये जबाबदार नागरिक म्हणून आणि विद्यापीठाचे विद्यार्थी म्हणून आपल्या पालकाचे नावलौकिक करावे. दिव्या सुतार, प्रियांका लोखंडे, डॉ. एन. बी. माने यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे प्र-संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. आर. व्ही. गुरव आदी उपस्थित होते.